# महाराष्ट्र जीवन प्राधिकरण

सिडको भवन,(दक्षिण कक्ष), बेलापूर,नवी मुंबई-४०० ६१४
दूरध्वनी:२७५७१६७३,२७५७०१६६ व २७५७८४०९
ई-मेल : ms@mjp.gov.in/ cao@mjp.gov.in


जा.क्र.मजीप्रा-२०२३/प्र.क्र.१७/पदो./आ-१ (उविअ), दिनांक :- २५ /१०/२०२३

उप अभियंता (यांत्रिकी) यांना कार्यकारी अभियंता (यांत्रिकी) या संवर्गातील रिक्त पदावर तात्पुरत्या स्वरुपात पदोन्नती देणेबाबत.

## कार्यालयीन आदेश

महाराष्ट्र शासन, सामान्य प्रशासन विभाग, मंत्रालय, मुंबई यांचे पत्र क्र. बीसीसी-२०१८/प्र.क्र.३६६/ १६-ब, दिनांक ७.५.२०२१ मध्ये मा.उच्च न्यायालय, मुंबई यांनी याचिका क्रमांक २७९७/२०१५ या प्रकरणी दि.४.८.२०१७ रोजी दिलेल्या निर्णयान्वये पदोन्नतीतील आरक्षण अवैध ठरविले असल्याने व मा.सर्वोच्च न्यायालयाने मा.उच्च न्यायालयाच्या या निर्णयास अद्याप स्थगिती दिलेली नसल्याने पदोन्नतीच्या कोटयातील सर्व रिक्त पदे दिनांक २५.५.२००४ च्या स्थितीनुसार सेवाज्येष्ठतेने भरण्यात यावीत, असे निर्देश दिले आहेत. तसेच जे मागासवर्गीय अधिकारी/कर्मचारी सामान्य प्रशासन विभाग, शासन निर्णय दि. २५.५.२००४ च्या शासन निर्णयातील तरतुदीनुसार पदोन्नतीमधील आरक्षणाचा लाभ घेऊन सेवा ज्येष्ठता यादीत वरच्या स्थानावर आले आहेत, असे अधिकारी/कर्मचारी

(अ) दि.२५.५.२००४ रोजी किंवा त्यापुर्वी शासन सेवेत रुजू झाले असल्यास ते त्यांच्या दि.२५.५.२००४ रोजीच्या सेवा ज्येष्ठतेनुसार पुढील पदोन्नतीस पात्र ठरतील व ;

(ब) दिनांक २५.५.२००४ नंतर शासन सेवेत रुजू झाले असल्यास ते त्यांच्या सेवाप्रवेशाच्या मुळ सेवा ज्येष्ठतेनुसार पुढील पदोन्नतीस पात्र ठरतील.

मा.सर्वोच्च न्यायालयाच्या विशेष अनुमती याचिका क्र. २८३०६/२०१७ वरील अंतिम निर्णयाच्या अधिन राहून भरण्यात यावीत असे निर्देश दिले आहेत. त्यानुसार उप अभियंता (स्थापत्य) यांना कार्यकारी अभियंता (स्थापत्य) पदावर तात्पुरती पदोन्नती देण्यात येत आहे.

२. पाणी पुरवठा व स्वच्छता विभाग शासन पत्र दिनांक ८.२.१९९९ अन्वये, महाराष्ट्र जीवन प्राधिकरणातील अभियांत्रिकी (स्था/यां) संवर्गातील विविध पदांना पाटबंधारे (जलसंपदा) विभागातील अभियांत्रिकी संवर्गातील अभियंत्यांसाठी वेळोवेळी निर्गमित केलेले सेवा भरती नियम जसेच्या तसे महाराष्ट्र जीवन प्राधिकरणास लागू करण्यात आले आहेत.

पाटबंधारे विभाग अधिसूचना क्र.बीसीएस-१५७७/४१५ (३०)-इ-(२) एफ दिनांक २.२.१९८१ मधील ३ (अ) नुसार, कार्यकारी अभियंता (यां.) या पदाची नियुक्ती ही, ज्यांनी उप अभियंता (पदवीधर) म्हणून कमीत कमी अखंड सात वर्षे आणि उप अभियंता (बिगर पदवीधर) म्हणून कमीत कमी दहा वर्षे सेवा पुर्ण केली असेल. तसेच उपरोक्त शासन निर्णयामधील अ.क्र.४ नुसार कार्यकारी अभियंता (यां) यांचे पदावर उप अभियंता (यां) पदवीधर व उप विभागीय अधिकारी (यां) पदविकाधारक यांच्यामधून केल्या जाणाऱ्या नियुक्तीचे प्रमाण २:१ असे आहे.

...२/-

Recd 28/10/23.

2023-31-50341
30.10.2023

३. महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाच्या आस्थापनेवर कार्यकारी अभियंता (यांत्रिकी) या पदोन्नतीच्या कोटयातील पदावर खालील विवरणपत्रातील उप अभियंता (यांत्रिकी) पदविकाधारक यांना शासन निर्णय, सामान्य प्रशासन विभाग, मुंबई दिनांक ७.५.२०२१ रोजीच्या शासन निर्णयातील मार्गदर्शक सुचनांनुसार, मा.उच्च न्यायालय, मुंबई यांनी याचिका क्र. २७९७/२०१५ या प्रकरणी दिनांक ४.८.२०१७ रोजी दिलेल्या निर्णयान्वये पदोन्नतीतील आरक्षण अवैध ठरविले असल्याने व मा.सर्वोच्च न्यायालयाने मा.उच्च न्यायालयाच्या निर्णयास अद्याप स्थगिती दिलेली नसल्याने पदोन्नतीच्या कोटयातील सर्व रिक्त पदे दिनांक २५.५.२००४ च्या स्थितीनुसार सेवाज्येष्ठतेनुसार भरावयाची आहेत. ही बाब विचारात घेऊन एस-२३: ६७७००-२०८७०० या वेतनश्रेणीत कार्यकारी अभियंता (यांत्रिकी) या पदावर तात्पुरती पदोन्नती देण्यात येत आहे. सदर पदोन्नत कार्यकारी अभियंता (यांत्रिकी) यांना नागरी सेवा मंडळाची शिफारस तसेच सक्षम प्राधिकारी यांच्या मान्यतेने खालील तक्त्यातील रकना क्र.३ मध्ये दर्शविल्यानुसार पदस्थापना देण्यात येत आहे.

| अ. क्र. | अधिका-याचे नांव, पदनाम व कार्यरत कार्यालयाचे नांव | तात्पुरत्या पदोन्नतीनंतरच्या पदस्थापनेच्या कार्यालयाचे नांव | शेरा |
|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ |
| १ | श्री.एस.एन.श्रीखंडे, उप अभियंता (यां.) म.जी.प्रा.यांत्रिकी मंडळ, नागपूर | कार्यकारी अभियंता (यां.), म.जी.प्रा. मंडळ, नागपूर | रिक्त पदी |

४. वरील विवरणपत्रातील उप अभियंता (यांत्रिकी) यांना कार्यकारी अभियंता (यांत्रिकी) या संवर्गात खालील अटी/शर्तीच्या अधीन राहून केवळ तात्पुरती पदोन्नती देण्यात येत आहे.

१. वरील उप अभियंता (यांत्रिकी) यांना कार्यकारी अभियंता (यांत्रिकी) या पदावर देण्यात येत असलेली पदोन्नती शासन निर्णय, सामान्य प्रशासन विभाग, मुंबई यांचे शासन निर्णय दिनांक ७.५.२०२१ अनुसार, मा.उच्च न्यायालय, मुंबई यांनी याचिका क्र.२७९७/२०१५ या प्रकरणी दिनांक ४.८.२०१७ रोजी दिलेल्या निर्णयान्वये पदोन्नतीतील आरक्षण अवैध ठरविले असल्याने व मा.सर्वोच्च न्यायालयाने मा.उच्च न्यायालयाच्या निर्णयास अद्याप स्थगिती दिलेली नसल्याने मा.सर्वोच्च न्यायालयात दाखल केलेल्या विशेष अनुज्ञा याचिकेच्या (विशेष अनुज्ञा याचिका क्र. २८३०६/२०१७) अंतिम निर्णयाच्या अधिन राहून पदोन्नतीच्या कोटयातील रिक्त पदे निव्वळ तात्पुरत्या स्वरुपात दिनांक २५.५.२००४ च्या स्थितीनुसार सेवा ज्येष्ठतेच्या स्थितीनुसार केवळ तात्पुरती पदोन्नती देण्यात येत आहे.

२. भविष्यात महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाची काही कार्यालये कमी कार्यभारामुळे बंद करावी लागल्यास किंवा अन्य कोणत्याही कारणास्तव पदावनत करण्याची आवश्यकता भासल्यास कोणतीही नोटीस किंवा पुर्वसूचना न देता कनिष्ठतम अधिकाऱ्यास "शेवटच्यास प्रथम" (Last come first go) या तत्वानुसार पदावनत करण्यात येईल व त्यांचा कार्यकारी अभियंता (यांत्रिकी) पदाच्या ज्येष्ठतेवर हक्क राहणार नाही.

...३/-

३. उक्त पदोन्नत कार्यकारी अभियंता (यांत्रिकी) यांच्या उप अभियंता (यांत्रिकी) सवंर्गाच्या सेवाज्येष्ठतेमध्ये काही बदल उद्भवल्यास त्यानुसार त्यांचे सेवाज्येष्ठतेमध्ये होणारा बदल नोंदवून आवश्यक ती अनुषंगिक पुढील कार्यवाही करण्यात येईल. परिणामी ज्येष्ठतेवर हक्क राहणार नाही.

४. पदोन्नत कार्यकारी अभियंता (यांत्रिकी) यांनी पदस्थापनेच्या ठिकाणी तात्काळ रुजू व्हावे. तसेच पदोन्नत कार्यकारी अभियंता हे विहीत कालावधीत नेमणूकीच्या ठिकाणी रुजू झाले नाहीत तर त्यांचे पदोन्नतीचे आदेश आपोआप रद्द होतील.

५. उपरोक्त पदोन्नत अधिकाऱ्यांनी त्यांच्या पदोन्नतीच्या पदावरील त्यांच्या वेतननिश्चिती संबंधीताचा विकल्प एक महिन्याच्या आत संबंधित कार्यालयास सादर करावा. विकल्प न दिल्यास त्यांची वेतन निश्चिती सरळ म.ना.से.(वेतन) नियम-१९८१ मधील नियम ११ (१) (ए) नुसार पदोन्नतीचा दिनांक विचारात घेऊन केली जाईल.

DSD 25/5/23

**(दिपाली देशपांडे-सावेडकर)**
**मुख्य प्रशासकीय अधिकारी**

- मा.मंत्री, पाणी पुरवठा व स्वच्छता तथा अध्यक्ष, म.जी.प्रा. यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई
- प्रधान सचिव, पाणी पुरवठा व स्वच्छता विभाग, मंत्रालय, मुंबई
- सदस्य सचिव, महाराष्ट्र जीवन प्राधिकरण, एक्सप्रेस टॉवर्स, मुंबई

प्रत :माहिती व कार्यवाहीसाठी

- संचालक (वित्त), महाराष्ट्र जीवन प्राधिकरण, सिडको भवन, नवी मुंबई
- मुख्य अभियंता, महाराष्ट्र जीवन प्राधिकरण, प्रादेशिक विभाग, नागपूर
- अधीक्षक अभियंता (यांत्रिकी), यांत्रिकी मंडळ नवी मुंबई/नागपूर
- अधीक्षक अभियंता, महाराष्ट्र जीवन प्रधिकरण मंडळ, नागपूर/चंद्रपूर
- अधीक्षक अभियंता (मुख्यालय), महाराष्ट्र जीवन प्राधिकरण, एक्सप्रेस टॉवर्स, मुंबई
- अधीक्षक अभियंता, महाराष्ट्र जीवन प्रधिकरण, म.नि.सं.व सं. कक्ष, मित्तल चेंबर्स, मुंबई
- अधीक्षक अभियंता, महाराष्ट्र जीवन प्रधिकरण, गुणवत्ता परिक्षण व दक्षता पथक, नवी मुंबई
- कार्यकारी अभियंता, महाराष्ट्र जीवन प्रधिकरण विभाग नागपूर/चंद्रपूर
- पदोन्नत कार्यकारी अभियंता (यांत्रिकी)
- कार्यालयीन आदेश धारिका
- उप अभियंता, मजीप्रा. आयटी सेल, बेलापूर, नवी मुंबई.